N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगाव **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0247 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/06/2019 23:09 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, १९२९ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** प्रहर 6

**Date From (दिनांक पासून):** 03/06/2019

**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/06/2019

**Time From (वेळेपासून):** 16:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/06/2019 **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/06/2019 22:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेवगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणार):**

(a) **Name (नाव):** बाळासाहेब विक्रम औंधके

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1977 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पासपोर्ट क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामुंगी ताशेवगाव जिअनगर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामुंगी ताशेवगाव जिअनगर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोहर असाराम डोळस | | | 1. पुरवठा विभाग ,तहसिल कार्यालय , शेवगाव ,तहसील कार्यालय ,शेवगाव , शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

शेवगाव पोस्टे गु.र.नं. 247/2019 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम -1988 (संशोधन 2018 ) चे कलम -7 प्रमाणे. फिर्यादी- बाळासाहेब विक्रम आँधळे वय-42 रा.मुंगी ता.शेवगाव जि.अ.नगर. आरोपी-मनोहर असाराम डोळस वय- 52 धंदा- नोकरी कनिष्ठ लिपीक (गोदामपाल ) पुरवठा विभाग ,तहसिल कार्यालय शेवगाव जि,.अ.नगर. रा. ढोरजळगावने ता.शेवगाव जि.अ.नगर. अप.घ.ता.वेळ.ठिकाण-दि.03/06/2019 रोजी 16/45 वा.चे सुमारास शेवगाव तहसिल कार्यालयाचे पोर्चसमोरील मोकळ्या आवारात शेवगाव मागीतलेली लाचेची रक्कम- 15000/-रु. स्वीकारलेली लाचेची रक्कम 15000/- रु.हस्तगत लाचेची रक्कम- 15000/-रु. हकिगत-यातील आरोपी लोकसेवक यांनी तहसिलदार शेवगाव येथे फिर्यादी यांचे शेतातील रस्ता संबधाने दाखल असलेल्या मामलेदार कोर्ट कायदा कलम -5(2) अन्वये दाखल रस्ता केस क्र. 15/2018चे निकालपत्र देण्यासाठी म्हणुन आज दि.30/06/2019 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी कारवाई दरम्याने पंच नं. 1) श्री नजन यांचे समक्ष फिर्यादी यांचेकडे 15000/- रु.लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम आज रोजी आयोजीत लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान फिर्यादीकडुन 16/45 वा.चे सुमारास शेवगाव तहसिल कार्यालयाचे पोर्चसमोरील मोकळ्या आवारात पंचासमक्ष स्वीकारुन स्वताचा सांपतिक फायदा करुन घेऊन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम -1988 (संशोधन 2018 ) चे कलम -7 प्रमाणे वगैरे म।।चे फि।।वरुन गुन्हा रजि दाखल करुन पुढील तपास पोनि.दिपक करांडे नेमणुक -अँन्टी करप्शन ब्युरो अ.नगर. करित आहो( शब्द संख्या अभावी मुळ फिर्याद जोडुन सादर केली आहे. )



Scanned by CamScanner

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Ramraov Tribkraov Dhikle(I (Inspector)) / 1234 or

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे Rank (पद):

No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाम): Ramraov Tribkraov Dhikle
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 1234

पोलीस ठाणे अमलदार
शेवगाव पोलीस स्टेशन



Scanned by CamScanner

फिर्याद

शेवगांव, जि.अहमदनगर
दि. ०३/०६/२०१९

मी बाळासाहेब विक्रम आंधळे वय ४२ वर्षे धंदा शेती रा.मुंगीगाव, चारी नं.१, ता.शेवगांव जि.अहमदनगर मोबा नं.९६८९९९९३१९

समक्ष फिर्याद देतो की,मी वरिल पत्त्यावर कुटूंबासह राहण्यास असुन शेती व्यवसाय करतो, मी दि. ०१/०६/२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर युनिट कार्यालयातील श्री.दिपक दत्तात्रय करांडे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर यांचेशी संपर्क करून त्यांना एका लोकासेवका विरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली त्या तकारीत मी सांगितले कि, माझी मुंगी शिवारातील माझे नावे गट नंबर २४७/९अ मध्ये ०.६० आर क्षेत्र असुन सदरच्या क्षेत्रामध्ये मला जाण्या येण्यासाठी वहिवाट नसल्याने मी दि.०४/२०१८ रोजी माननीय तहसिलदार शेवगाव यांच्याकडे वहिवाट मिळणेसाठी मा. तहसिलदार कोर्ट कायदा कलम ५/२ अन्वये अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे मा. तहसिलदार यांनी स्थळ निरीक्षण केले परतु निकाल अध्याप पर्यत दिला नाही मात्र मी सदर निकाल मिळणे कामी वांरवार तहसिल कार्यालय शेवगाव येथे जावुन पाठ पुरावा केला असता तेथील कर्मचारी श्री जाधव व श्री डोळस लिपीक यांनी मला निकाल आदेशाचे काम करुन देण्यासाठी श्री डोळस यांनी मला ५०,०००/—रु मागणी केली व तडजोडी अंती त्यांनी २०,०००/—रु मागीतले तसेच श्री जाधव यांनी पैसे मागणी केली आहे. त्यांना मी सरकारी फी आहे का असे विचारले असता ते म्हणाले पैश्या शिवाय काम होत नाही पैसे दिले तरच निकाल मिळेल, त्यावेळी मी समजलो श्री जाधव व श्री डोळस दोघे ही लिपीक हे मला निकाल देण्याच्या कामासाठी लाचेची मागणी करत आहे. तरी मला लाच देण्याची इच्छा नाही मी श्री जाधव व श्री डोळस लिपीक यांची तहसिल कार्यालय शेवगाव येथे जावुन भेट घेऊन निकालाच्या कामाबाबत बोलणी करणार आहे. जर त्यावेळी त्यांनी मला निकालाच्या कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करावी अशी तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि करांडे यांनी मला आज दि. ०३/०६/१९ रोजी सकाळी १०.३० वा शेवगांवचे अलीकडे शेवगांव मिरीरोड वर असणाऱ्या ममता लॉन्स याठिकाणी हजर राहणे बाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी आज सकाळी १०.३० वा ममता लॉन्स येथे हजर राहीलो. त्याठिकाणी पोनि करांडे हे त्यांचे पथकासह शासकिय वाहनाने आले. त्यांनी माझी ओळख करून घेवुन त्यांची स्वताची व सोबतचे स्टाव व पंच श्री. नजन व श्री. मकासरे यांची ओळख करून दिली. मला दिले सुचने प्रमाणे मी माझी वरिल प्रमाणे लाच मागणी तक्रार पंचासमक्ष कथन केली व माझ्या हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यात मी माझा व श्री जाधव, श्री डोळस यांच्याशी कोणत्याही प्रकारचा आर्थिक देण्या घेण्याचा उधार उसन वारीचा व्यवहार नाही. तसेच भांडण तंटा नाही अगर वैर नाही आता मी आपणास दाव्याचे अर्ज व इरत कागदपत्र हजर करीता आहे. मी आज त्यांची शेवगांव तहसिल कार्यालयात जावुन भेट घेणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी श्री. जाधव व श्री. डोळस लिपीक यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि.श्री.करांडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असलेबाबत कळवून त्याचा वापराबाबत व हातळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.नि.करांडे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पो.नि करांडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.१ श्री.नजन यांना सुचना समजावुन सांगितल्या, त्यानंतर माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो गळयात अडकावुन मला, पंच नं.१ श्री.नजन यांचेसह लिपीक श्री. जाधव व श्री. डोळस यांची भेट घेण्यासाठी शेवगांव तहसिल कार्यालय येथे रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.१ श्री.नजन यांचेसह तहसिल कार्यालय शेवगांव येथे गेलो. तेथे माझी श्री. जाधव लिपीक यांचेशी भेट झाली त्यावेळी त्यांनी तहसिलदार साहेबांनी थांबण्यास सांगितले आहे, करतो म्हणाले, बघावं लागेल असे म्हणाले. मी त्यांना आंधळेची फाईल असल्याची सांगितले आहे असे बोलले. मी जाधव यांना लवकर करा कुठपर्यन्त वाट पाहीयची असे म्हणता श्री.जाधव यांनी दुपारी फोन लावतो असे सांगितले. त्यानंतर मी निघुन आलो.

त्यानंतर मी दुपार पर्यन्त श्री.जाधव यांचे फोनची वाट पाहील परंतु त्यांचा फोन आला नाही. त्यानंतर पोनि करांडे यांनी पुन्हा मला व पंच श्री. नजन यांना श्री. जाधव व श्री. डोळस यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय येथे व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकावुन पाठविले. कार्यालयात श्री. जाधव हजर नव्हते तेथे श्री.

शेवगांव पो स्टे. गुरनं. 247/19 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन - 1988 (संशोधन-2018) चे कलम - 7 प्रमाणे दाखल तारिख 03/06/2019 22-56 वा. नोंद क्र. 27

पोलीस ठाणे अमलदार शेवगाव पोलीस स्टेशन

Scanned by CamScanner

डोळस भेटले त्यांनी मला संध्याकाळी फाईल घेवुन बोलावले आहे असे म्हणुन पंधरा असे म्हणुन पैशाचा सांकेतिक इशारा केला, मी त्यांना काही कमी जास्त पहा, नऊ महीन्यापासुन चकरा मारतोय अशी विनंती करता. श्री डोळस यांनी हजार दोन हजार कमी करण्यास म्हणु शकतो असे म्हणाले, त्यानंतर माझे निकालाचे कामासंबंधाने माझेत व डोळस असे आमचेत बोलणे झाले, डोळस यांनी माझेकडे माझे रस्त्याचे केसच्या निकालाचे कामासाठी १५०००/– रूपये लाचेची मागणी केली. मी त्यांना पैसे जुळवाजुळव करून येतो असे म्हणुन पंचासह परत पो.नि करांडे थांबले त्याठिकाणी निघुन आलो.

त्यानंतर तेथे पो.नि करांडे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला व मला गाडीत बसण्यास सांगितले. माझे सोबत आलेले पंच नं.१ श्री.नजन यांना व मला घडले हकीकती बदल विचारण केली आम्ही वरिल प्रमाणे हकीकत सांगितली.त्यानंतर पो.नि करांडे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ते मी व पंच नं.१ यांनी कथन केले हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करून त्याचा उतारा तयार केला, श्री. डोळस यांनी माझ्याकडे स्पष्टपणे १५०००/– रूपये लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई तहसिल कार्यालय शेवगांव येथे आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर पो.नि करांडे यांनी श्री. डोळस यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील २०००/– रूपये दराचे ७ चलनी नोटा व ५००/– रूपये दराच्या २ चलनी नोटा असे १५०००/–रूपये असे समक्ष हजर केले. त्यानंतर ॲन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आणि मी हजर केलेल्या नोटांना पो.ना चौधरी यांनी ॲन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे शर्टचे छातीवरील डाव्या खिश्यात ठेवुन दिली. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळया दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेशीर कारवाई करण्यात आली.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड घालुन त्यात काहीएक ध्वनीमुद्रीत नसल्याचे आमची खात्री करून देवुन मला पंच नं.१ सह श्री. डोळस यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय शेवगांव येथे दुपारी १६/१६ वा रवाना केले. मी पंच नं.१ श्री.नजन यांना माझे मोटार सायलवर घेवुन तहसिल कार्यालय शेवगांव येथे जावुन लोकसेवक डोळस यांची भेट घेतली असता त्यांनी माझेकडुन पंचासमक्ष १५०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे नेसते पॅन्टचे पाठीमागील उजव्या खिश्या ठेवुन दिली. त्यावेळी मी १६/४५ वा सुमारास लाच स्विकारल्याचा इशारा केला. तो इशारा पाहुन पो.नि करांडे व सापळा पथक असे माझ्या जवळ आले पो.नि करांडे यांनी व्हाईर रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर लोकसेवक श्री. डोळस यांना रंगेहाथ पकडुन त्यांचे ताब्यातील लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली, तहसिल कार्यालय शेवगांच येथे माझे हात व कपडयाची अंधार खोलीत तपासणी करण्यात आली. तेथील कामकाज आटोपल्यानंतर पो.नि करांडे व सापळा पथक श्री. डोळस यांचेसह सा.बां विश्रामगृह शेवगांव येथे आलो. तसेच मलाही तेथे येण्याची सुचना वरून मी तेथे हजर झाला. पो.नि करांडे यानी पुढील सर्व कायदेशीर कामकाज सा.बां विश्रामगृह शेवगांव येथे पुर्ण केले.

तरी यातील लोकसेवक श्री. मनोहर आसाराम डोळस वय ५२ वर्षे धंदा नोकरी, कनिष्ठ लिपीक, गोदामपाल पुरवठा विभाग, नेमणुक तहसिल कार्यालय, शेवगांव जि.अहमदनगर यांनी तहसिलदार शेवगांव येथे माझे शेतातील रस्ता संबंधाने दाखल असलेल्या मामलेदार कोर्ट कायदा कलम ५(२) अन्वये दाखल रास्ता केस क्रं. १५/२०१८ चे निकालपत्र देण्यासाठी म्हणुन आज दि.०३/०६/२०१९ रोजी करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंच नं.१ श्री. नजन यांचेसमक्ष माझेकडे १५०००/– रूपये लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम आजरोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन १६/४५ वा सुमारास शेवगांव तहसिल कार्यालय इमारतीचे पोर्च समोरील असलेल्या मोकळया आवारात पंचासमक्ष स्विकारून स्वताचा सांपत्तीक फायदा करून घेवुन, गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेवक मनोहर आसाराम डोळस लिपीक तहसिल कार्यालय शेवगांव वर्ग ३ यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

( बाळासाहेब विक्रम आंधळे )

Scanned by CamScanner